# दि रीडिंग क्लब' उपक्रम अहवाल- कार्यक्रम क्र. ४

## मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

दि. **११ जुलै २०२५ (शुक्रवार)** रोजी मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखेच्या *'दि रीडिंग क्लब'* या उपक्रमांतर्गत **जागतिक लोकसंख्या दिन** या विशेष दिनाचे औचित्य साधून *"भारतीय लोकसंख्या वाढ : विकासातील आव्हाने व संधी"* या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या व्याख्यानासाठी प्रमुख साधनव्यक्ती म्हणून **डॉ. शायिन शेख**, वरिष्ठ शैक्षणिक संयोजक, अर्थशास्त्र यांनी मार्गदर्शन केले. हा कार्यक्रम दुपारी ४.०० वाजता विद्याशाखेच्या सभागृहात पार पडला. या कार्यक्रमास शैक्षणिक संयोजक व कार्यालयीन कर्मचारी उपस्थित होते.



डॉ. शेख यांनी आपल्या व्याख्यानात लोकसंख्या वाढीचे आर्थिक परिणाम, विकासातील असमतोल, संसाधनांचे दडपण, बेरोजगारी, गरीबी तसेच उत्पन्न विषमता यावर सविस्तर चर्चा केली. त्यांनी लोकसंख्या वाढीमुळे निर्माण होणाऱ्या आव्हानांबरोबरच वाढत्या लोकसंख्येतील तरुण शक्ती योग्य प्रकारे वापरल्यास ती विकासासाठी संधी कशी ठरू शकते, यावर मुद्देसूद विचार मांडले. विशेषतः भारतातील लोकसंख्या रचनेतील बदल, लोकसंख्या लाभांश (Demographic Dividend), मानवी भांडवलात गुंतवणुकीची आवश्यकता आणि शाश्वत विकासाच्या धोरणांची गरज यावर त्यांनी भर दिला. व्याख्यानादरम्यान उपस्थित शिक्षक व समुपदेशकांसोबत लोकसंख्या नियंत्रण, रोजगार निर्मिती, ग्रामीण व शहरी विकासातील धोरणात्मक दृष्टिकोन यावर चर्चा करण्यात आली.

कार्यक्रमाच्या शेवटी मुक्त चर्चा व प्रश्नोत्तर सत्र झाले, ज्यामध्ये सहभागी शिक्षक व समुपदेशकांनी आपले विचार मांडले. सर्वांनीच व्याख्यानाचे कौतुक केले व *दि रीडिंग क्लब*अंतर्गत अशा शैक्षणिक व चिंतनपर उपक्रमांचे नियमित आयोजन करण्याची आवश्यकता व्यक्त केली. एकूणच, *"भारतीय लोकसंख्या वाढ : विकासातील आव्हाने व संधी"* या विषयावरील डॉ. शायिन शेख यांचे व्याख्यान विचारप्रवर्तक ठरले आणि सहभागींच्या आर्थिक व शैक्षणिक दृष्टिकोनाला नवीन दिशा देणारे ठरले.

मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा
य.च.म.मु.वि., नाशिक